१५०
काव्य.

नं. १५०
म. ग्रं. सं. ठाणें

| विषय | |
|---|---|
| काव्य | |
| संग्रहालय क्रमांक | १३७ |

लेखक अं. रा. गौडकर

सन १८८९

पुस्तकाचें नांव वेश्यागमननिषेधक बोध

२४६

१८८९
म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
वा. नं. १३७

[illegible] प्रत्येक वडिलानें आपल्या तरुण
मुलांकडून अवश्य वाचवावें.

# वेश्या गमन निषेधक बोध.

अर्थात्

रंडीबाजीच्या वाईट परिणामाचें

संक्षिप्त दिग्दर्शन.

---

हें पुस्तक.

अं० रा० गाडेकर.

यांनीं

लोक कल्याणार्थ

मुंबई मध्यें.

"जगमित्र" छापखान्यांत छापिलें.

सन. १८८५

किंमत—पाऊण आणा.

## उपदेशक—समाजात येऊन ईश्वराची व सभासदाची प्रार्थना करितो.

### श्लोक.

जयाच्या सत्तेनें स्थिति, लय समुत्पत्ति घडाति, ॥
विजाती गोलांचे अमित गण आकाशिं फिरती ॥
जयाच्या आधारें सुबुधजन विघ्नाब्धि तरती, ॥
तया धीशाशीं मी स्मरुनिकरितों शीघ्र विनती. ॥

### पद.

जोडीबा सत्पद ह्या जगांत ॥ धृ० ॥
श्रेष्ठ असे कीं मानव देह ॥
निशिदिनी आणि मनांत ॥ जो० ॥
कामादि षड्रिपू नियमित ठेवी ॥
धरिदृढ सत्य वृत्त ॥ जो० ॥
सत्कीर्तिचा घरीं उभारुनि झेंडा ॥
नांद तूं सुखि सदनांत ॥ जो० ॥
सोडुनि गर्वा दुर्व्यसनांतें ॥

हो रत सत्कर्मांत ॥ जो० ॥
धन, अधिकार हे मत्त करीती ॥
धन्यता नम्रपणांत ॥ जो० ॥
सन्मार्ग दर्शक विनविती बा तुज ॥
सार्थक नर देहांत ॥ जो० ॥

## थोडासा स्तब्ध होऊन.

अहो वेश्यासक्त लोक हो, काय तुह्मीं या मायावी स्त्रियांसीनिमग्न होऊन गेलां आहां! या जारिणी स्त्रिया किती कपटी असून द्रव्य हरण करणाऱ्या आहेत हें तुह्मांस ठाऊक आहे काय ? मला असें वाटतें कीं जर त्यांची कपट बुद्धि तुह्माला ठाऊक असती तर तुह्मीं त्यांच्या नादीं लागले नसतां; ह्या किती कपटी व मायावी आहेत हें तुह्मांला समजावें ह्मणून विद्वान् लोकांच्या मुखांतील निवडक वेंचे आपणा पुढें ठेवीत आहें त्यांजवर किंचित् लक्ष द्या आणि शरीर नाशक, द्रव्यहारक, कपट चालक, अशा ह्या ज्या वेश्या त्यांचा त्याग करा; आणि आपली जन्माची जी सोबतीण-विवाहित स्वस्त्री तिला संतोषवा ह्मणजे ईश्वर तुह्मांस इह व परलोकीं सुखी ठेवील.

### पद.

गणिका मंदीर दुःखाची खाण ॥ धृ० ॥ १ ॥
जोंवरी संपत आहे जवळी ॥

का- ९३५



त्या होती दासी निदान ॥ ग० ॥
निर्धन होतां सर्व प्रकारें, ॥
होशी तूं केरासमान ॥ ग० ॥
निर्लज्ज पणें जाशि जरी तूं ॥
बैसूं न देती हि क्षण ॥ ग० ॥
स्वस्त्रीशी सोडुनी सर्व गमावुनि ॥
काय केलें मनीं आण ॥ ग० ॥
सन्मार्गाचे दर्शक ह्मणती ॥
वेश्या हें विषची जाण ॥ ग० ॥

## साक्या.

वेश्या पारधि मोह जालकीं ।
चतुर जार मीनांतें ॥
धरूनी कवळुनि लुब्ध करीती ।
दाविति प्रेम रसातें ॥
नेत्र शरासनिं हाव भाव ।
शरलावूनि भेद करीती ॥
शतधा हृदयीं पर पुरुषांच्या, ।
वीरांपरि, ह्या मूर्ती ॥ २ ॥
कपटें लावुनि लटका चुटका ।
घटाका भरि प्रेमाचा ॥
मोहिति विटका हटकुनि परिहा ।

घुटका जाण विषाचा ॥ ३ ॥
हरिती कारण दाऊनि संतत ।
संपत वार मृगाक्षी ॥
मिठि मारूनी कंठिं तयांच्या ।
अंतीं शोधिति कक्षी ॥ ४ ॥

## ठुंबरी.

मनुजा दूर करी परनारी ॥ ध्रु० ॥
आदर पूजन करिति हराया ॥
धन दौलत ही सारी ॥ म० ॥

**मित्र हो.**— कोकण पट्टींत कोणी रामचंद्र पंत ह्मणून एक व्याभिचारी गृहस्थ राहत होता. त्याची यशोदाबाई ह्मणून साध्वी स्त्री होती. तिला पतीच्या दुर्व्यसना मुळें फार त्रास सोसावा लागत असे. एके दिवशीं ती आपल्या पतीच्या धोतराच्या पदरास धरून ह्मणाली हे प्राणपति ! मी अबला आहें, आणि आपण सबल आहां ह्मणून आपण मजपेक्षां ज्ञानी आहां; मीं आपणास सांगावें असें नाहीं. परंतु आपण आज ज्या व्यसनांत निमग्न आहां त्या पासून मला जें अनिवार दुःख होत आहे व आपला पुढें परिणाम काय होईल याचा रात्रंदिवस विचार करीत करीत झुरत आहें याचा विचार करा आणि मी सांगतें हें ऐका:—

काव्य ९८००

## गीत.

असतां मी निशिदिनीं तुमच्या सेवेला तत्पर ॥
कां सोडूनि जातां होउनी दीनावरि निष्ठुर ॥
नाहिं तुह्मांविण दुजा मजशीं सुखदाता तिळभर ॥
लग्नांतील संकल्प स्मरा जो केला धरूनी कर ॥
कीर्ती मळवूं नका दृष्ट द्या वाडवडिलावर ॥
समजुनि उमजुनि काय असें हें सांगा मज सत्वर ॥

## चाल २ री.

चंचळ तुमची मती हो ॥
घरिं नसे पळभर स्थिती हो ॥
कशी होइल पुढती गती हो ॥
पुरे करा हा छंद मागतें जोडुनि हे मी करा ॥
कांहो वेश्या लंपट झालां सोडुनि घरदारा ॥
कर जोडुनियां तुह्मा विनवितें ऐका ममप्रियकरा ॥
॥ कां० ॥ धृ० ॥
तारुण्याची दशा असे ही दो दिवसाची खरी ॥
क्षण प्रभेहुनि चंचळ संपत जाणा तुह्मि अंतरीं ॥
हीं जातां वल्लभा आलां भानावरती जरी ॥
होइल सर्वहि व्यर्थ म्हणूनी द्या दृष्टी दुरवरी ॥

क्षणभंगुर नरतनू असे संसार बुडबुड्या परी ॥
परलोकीचें साधन व्हावें केव्हां तुमचे करीं ॥

## चाल २ री.

हे विचार येऊनि मनी हो ॥
तळमळतें मी निशिदिनी हो ॥
नसे झोप मजलागुनी हो ॥
सर्वहि उमजुनि मनीं सत्वर सन्मार्गातें धरा ॥
॥ कां० ॥ धृ० ॥

रामचंद्र०—तूं वेडी आहेस त्यांत जें सुख आहे तें सांगतों:—

ऐक प्रिये तूं जें सुख होतें ।
वार मृगाक्षी पाहूनी ॥
तें सुख दुर्लभ शोधूं पाहातां ।
न सांपडे ह्या त्रिभुवनीं ॥ १ ॥
हावभाव बोलणें विलासिक ।
अवलोकन गायन ह्यांनीं ॥
लंपट झाला नाहीं ऐसा पुरुष ।
न पाही कधीं नयनीं ॥
काय कथा पामर मनुजांची ।
देवादिक गेले थिजुनी ॥
इंद्र, चंद्र ब्रह्मा, शिव, नारद, ।
व्यास पिता, कौशिक मुमुनी ॥

ग्रा. क्रां. ९

सर्वस्वी नाडिला तरी गे ।
कोण त्यजिल ह्या सुखलहरी ॥
माहेर विश्रांतीचें न दिसे जाण ।
दुजें ह्या संसारीं ॥
सर्वहि शोधून पाहातां दिसती ।
सौख्यरुप त्या परनारी ॥ मा० ॥

यशोदा०—आपण ज्याची साक्ष देतां त्याचा परिणाम काय झाला हें सांगतें.

चित्त देउनी स्वस्थ मानसें ।
माझि विनवणी ऐकावी ॥
इंद्रादिक स्त्री मोहित होतां ।
झाली दशा जी आहे ठावी ॥
सुरपति असतां सहस्त्र छिद्रें ।
पडूनियां शोभा जावी ॥
नारद ब्रह्मचारी असुनी ।
होउनी नारदी प्रसवावी ॥
कौशिक कृत अति दिव्य तपस्या ।
अशा प्रसंगीं भंगावी ॥
या परि भरले जे ह्या छंदीं ।
दशा तयांची जाणावी ॥
पामर मानव असतां ।
आपली होईल कैशी दशा बरी ॥

सन्मार्गाचे दर्शक ह्मणती ।
शुद्धीवर या आतां तरी ॥ सर्वांहि शोधुनि पाहतां
दिसती गरलरूप या परनारी ॥ सन्मा० ॥

## साक्या.

केला जरि उपदेश या परी ।
होई व्यर्थचि सारा ॥
रासभ देहीं अश्वरूपता ।
अणण्या जेवि पसारा ॥ १ ॥
धन, कीर्ती, तारुण्य ।
गमावुनि अन्नावांचुनि फिरती ॥
ऐशी गति बहुतांची पाहुनी ।
वेश्या गृहिं जन शीरती ॥ २ ॥
आहे सुख बहु जरी सामर्थ्यें ।
क्षणभंगुर तें जाणा ॥
होई शाश्वत दुःख निश्चयें ।
विचार हा मनिं आणा ॥ ३ ॥

रामचंद्र०—( कांहीं दिवसांनीं जेव्हां निर्धन झाला तेव्हां पश्चातापून ) हे माझे प्राणसखे तुझें सर्व बोलणें खरोखर मला विषा प्रमाणें वाटत होतें. परंतु मी आज दरिद्री झालों त्यामुळें त्या जारणी स्त्रिया माझा तिरस्कार करूं लागल्या; त्यामुळें मला तुझ्या पूर्वोक्त शद्बांची

आठवण झाली. तूं सांगत होतीस तेव्हां जर मी ऐकिलें असतें तर मी एवढा अन्नास महाग झालों नसतों.

**यशोदा०**—आतां डोळे उघडले वाटतात. पूर्वी जेव्हां मी सांगत होतें तेव्हां ऐकलें असतें तर अशी दुर्दशा प्राप्त झाली नसती.

**रामचंद्र०**—आतां गेलेली गोष्ट पुन्हा येत नाहीं. मी ह्या मायावी जारणी स्त्रियांच्या नादानें निर्धन झालों. आतां लोकांनीं तरीं त्या दुःखकारक मायावी स्त्रियां पासून दूर असावें या कारितां मला अनुभवलेली त्यांची कपट बुद्धि कशी आहे हें सांगतों.

## पद.

वनिते, हा तव बोध रसाल ॥
ऐकूनि झालों फार खुशाल ॥
या नंतर मी गणिका बोल ॥
विष सम मानी ॥
सत्य वचन जाणी ॥
विषयावर मी सोडिलें पाणी ॥ सत्य० ॥ १ ॥
बोलणें गोड मदाचें बोट ॥
आदर सत्काराचा थाट ॥
दाविती प्रेमा फारची दाट ॥
परि वर करणी ॥ सत्य० ॥ २ ॥

हावा भावा सा नटकींच्या ॥
न भुलुनि कीर्ति करा, ही वाचा ॥
गाइली प्रेमें सन्मार्गाच्या, दर्शकांनीं ॥ सत्य०

## ठुंबऱ्या.

उघडी नयन अधीं तूं प्राण्या ॥ धृ० ॥
संपत ज्वानी गेल्यावरती ॥
पश्चाताप न होण्या ॥ उ० ॥ १ ॥
विषयीं नाहीं कुणा सुख झालें ॥
अगणित दुःखें भोगूनि अंतीं
यम सदनाशीं गेले ॥ वि० ॥ २ ॥

## दारूची लावणी.

ता० से० गा० व०

### एका संसारी स्त्रीचा पतीस उपदेश.

गुणिजना, आणावी मना, माझि प्रार्थना, एक ऐकावी ॥ सांगतें मी कर जोडुन, द्यावि सोडून, दारु ना प्यावी ॥ ध्रु० ॥ अतिरती बुडाले किती, नाहीं त्यां मिती, दारुच्या पायीं ॥ त्यांपुढें तुझी तर किती, खंडिला रती, देखिल पुरी नाहीं ॥ तुझि सूज्ञ जगीं वागते, ह्मणुन सांगतें, चरणिं लागतें गोष्ट ही ध्यावी ॥ निंदिति जन नाना रिती, ऐकतां होति, जीवाची लाही ॥ तुझि

का-१३२८



ठाणें.

बुडल्या घरचे मोड, लागली खोड, झालि जरी जोड, तरी सोडावी ॥ लौकिकास येते हानी, बरें ना कोणि, ह्मणे त्यालाही ॥ हें दुर्व्यसन वाईट, लागली चट, पुढें तर निट मज दिसत नाहीं ॥ पहा दुरवर, पुढील वीचारा घर संसार, धरावी सोई ॥ मातृगमनासम जाण, केल्या मधुपान, कचाचा प्राण, गेला या पायीं ॥ शुक्रानें दिध-ला, शाप, करून संताप, दारुच्या ठायीं ॥ गुणिज० ॥ १

अशि काय लागली रुची, तुह्मां दारुची, घरा अब-रुची, शरम जीवाला ॥ शरिराचे होती हाल, सदा धुंधलाल, घुमरि डोळ्यांला ॥ धोदरी मुखावर आली दिसूं लागली, रक्तपिती फुटली, ह्मणती त्याला ॥ प्रसन्न, बया ही झालि, नरोटी दिली, हातीं खायाला ॥ संगातीं सोबति जमउन, येतां घेउन, टिफिनि करकरुन, चारिलें ज्याला ॥ ते काय आतां तर मेले, किंवा दुर गेले, निघुन देशाला ॥ बेवडा बरांडी शिगा, मटन पुरि बघा त्यानें हा दगा, मी ह्मणतें तुह्मांला ॥ हात वला, तवर जग भला, असें एक मला, आलें प्रत्ययाला ॥ लावून कटाक्ष बोलतें, कसुन पाहतें, यानें तरि येतें, गुणासीं कांहीं ॥ ज्यानें लज्जा सोडिली, त्यानें जोडिली, अदल बाछाई ॥ गुणि० ॥ २ ॥

तुह्मिं सर्व सोडिला हुदा, दिली त्या बिदा, सदा ना कदा, धुंद अमलांत ॥ हांसाते व्याही जांवाइ, शरम ती

नाहीं, कांहीं मनांत ॥ होती कांहीं जिनगानी, कर्जदारांनीं, टांच लावुनी, नेलि ऋणांत ॥ पुढें देणें कसें तें द्याल, किंवा लाहा ध्याल, डाग वंशांत ॥ कुळीं कुळदीपक तुह्मि असे, प्रकाशित जसे, निपजला तसे, आला उदयांत ॥ लाविली कीर्तिची ध्वजा, उडविली मजा, दारु पीण्यांत ॥ मानवति वडिल धाकले, पुढें काय मुलें, आठविति आपुले, गुण चौघांत ॥ संग्रहीं नाहीं गुंज वाल, निशामधिं लाल, बे हाल घरांत ॥ सारी रात्र वाचली गीता, गोंधळी कथा, आवडली चित्ता, असें ज्या ठायीं पालथ्या घड्यावर पाणी, व्यर्थ घालूनी, कांहीं फळ नाहीं. ॥ गुणिज० ॥ ३ ॥

अशि काय सखे सुंदरी, बोलसी तरी, गोष्ट ही खरि, माझे स्वहिताची ॥ दुर्दशा दारुच्या पायिं, ऐकतों मीहि, कथा बहुतांची ॥ मोठे मोठे साधु सुज्ञान, शास्त्रि विद्वान् त्यांस प्रीति जाण, तूं शाक्तमताची ॥ नित्यानें चालविति माप, ठेवून टिपटाप् बातबेताची ॥ जे फार उघडकिस आले, भ्रष्ट जाहले, यातिला मुकले, असें कळतांची ॥ परिणाम खरा वाइट, बोललीस गोष्ट, सखे ममतेची ॥ आजपासून हें मधुपान, सोडिलें जाण, वाहतों आण, तुझ्या रक्ताची ॥ गेलि गंगा राहिलें तीर्थ, नको छळूं व्यर्थ, ही गोष्ट हाताची ॥ दुल्ला रखमा करि छंद, अचुक कटिबंद, ऐकतां आनंदती गुणग्राही, ॥ तेजीला इशारत गुणी, तट्टाला टुमाणि, लदुनीत लावी ॥ गुणिज॥४॥

**समाप्त.**